अशी आमची शाळा (संग्रहित)

इंग्रजी राज्याची पकड ह्या देशावर घट्ट बसली असतानाच राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या नवध्येयाने प्रेरित झालेल्या लो. टिळक, आगरकर व चिपळूणकर यांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल या शाळेची स्थापना केली. ह्या द्वारा जणू विद्यादानासाठी होमाचे यज्ञकुंडच प्रज्वलित झाले. देशसेवेचे ध्येय उराशी बाळगून विविध क्षेत्रात काम करण्यासाठी अनेक तरूण बद्धपरिकर होऊन या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडले. कै.श्री. गोपाळराव ना. अक्षीकर याच शाळेतून स्फूर्ती ,उत्साह आणि प्रेरणा यांचा वारसा घेऊन बाहेर पडले आणि शिक्षण प्रसार हेच आपल्या जीवनाचे ध्येय त्यांनी निश्चित केले.

कल्याण परिसरात १८५३ साली सुरू झालेली एक शाळा १८८९ च्या सुमारास बंद पडण्याच्या मार्गावर होती. कल्याणातील  पालकांनाही आपल्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न भेडसावत होता. ह्यावेळेपर्यंत गोपाळरावांच्या शिक्षण प्रसाराच्या कळकळीच्या वार्ता कल्याणपर्यंत येऊन पोहोचल्या होत्या. म्हणूनच कल्याणातील काही समाजधुरिणांनी गोपाळरावांची भेट घेतली व परिस्थितीची कल्पना दिली.

२ जानेवारी १८९० रोजी हायस्कूल, कल्याण ह्या शाळेची स्थापना झाली. सुभेदार बिवलकरांच्या वाडयात ह्या शाळेचे रोपटे लावले गेले. श्री. गोपाळराव अक्षीकरांबरोबर खांद्याला खांदा लावून काम करीत होते ते श्री. केशव म. ताम्हाणे. हे दोघे दादरहून येऊन शाळेचे काम सांभाळत असत म्हणून कल्याणातील स्थानिक व समाजात मात्तबर असलेले श्री. गणेश रा. लेले यांच्यावर त्यांनी शाळेची जबाबदारी टाकली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच असा होता, की पहिल्याच वर्षी विद्यार्थ्यांची संख्या ९६ वर गेली. त्यागी वृत्तीने काढलेल्या ह्या शाळेचा

कारभार अतिशय चोख आणि दक्षतेने चाले. ह्याबद्दल भारताचार्य चिंतामण वि. वैद्य यांनीही कौतुक केले. पुढे शाळेच्या संख्येत भर पडत गेली आणि शाळेला सरकारी अनुदान मिळू लागले.

१९२१ साली विद्यार्थी संख्या १७७ वर गेली. अध्यापन कार्याची तळमळ व आत्मीयता असणारे दोन तरुण पदवीधर सरकारी नोकरी सोडून अक्षीकरांच्या या कार्यात सामील झाले होते. श्री. रामचंद्र वै. भिडे व श्री. भगवान गं. चोळकरांच्या हातात सूत्रे येताच शाळेची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली. मुख्याध्यापक श्री. रा. वै. भिडे यांनी कल्याणकरांच्या सहाय्याने शिक्षणोत्तेजक संस्था ह्या संस्थेची स्थापना केली व ह्या संस्थेने दिलेल्या आर्थिक पाठिंब्यावर शाळेत इ. ६ वी, १९२४ साली इ. ७ वी असे वर्ग सुरू झाले. १९२५ साली शाळेतील विद्यार्थी प्रथमच (एस. एल. सी.) परीक्षेसाठी मांडवाखालून गेले आणि शाळेने इंग्रजी पहिली ते सातवी (११ वी एस.एस.सी) असे पूर्ण रूप धारण केले.

१९४० साली शाळेने आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यावेळी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली शाळेने आपला सुवर्णमहोत्सव अतिशय समाधानाने व अभिमानाने साजरा केला.

ह्या नंतर स्टेशनच्या बाजूला राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळेची दुसरी एक शाखा जोशी बागेत काढण्यात आली ती १९४१ साली. श्री. रा. वै.. भिडे तेथे मुख्याध्यापक म्हणून गेले व श्री. चोळकर यांनी ह्या शाळेत मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळली.

देशातील स्वातंत्र्य आंदोलने, कायद्याने लावलेली सरकारी बंधने, राष्ट्रीयपित्याचा अमानुष वध ह्याचा परिणाम शाळेवरही झाला. शाळेला अतिशय कठीण परिस्थितीतून वाटचाल करावी लागली. काही काळ अनुदानही बंद झाले. संस्थाचालक ह्यामुळे अजिबात डगमगले नाहीत. १९४९ पर्यंत अशाच अडचणी येत राहिल्या.

१९४९ नंतर मात्र शाळेची वाटचाल वेगाने सुरू झाली. श्री. गजानन र. केळकर मुख्याध्यापक यांचा सेवा अनुभव आणि लौकिक उपकारक ठरला. त्यांच्याच अथक प्रयत्नाने शाळेचे अनुदान परत सुरू झाले आणि शाळेचे आर्थिक जीवन सुधारले.

१९५० च्या सुमारास तरंग हा वर्षांक सुरु झाला. विद्यार्थ्यांना लोकशाही पध्दतीचे सहकार्यात्मक अनुभव व शिक्षण देणारी विद्यार्थ्यांची लोकसभा व इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांचा विद्यार्थी दिन हे सर्व सुरू झाले.

१९५४ साली विद्यार्थी संख्या वाढल्याने दोन अधिवेशनात शाळा भरू लागली होती व हळूहळू शाळेच्या गुणवत्तेतील वाढही प्रकट होऊ लागली. १९५७ साली परीक्षेचा निकाल ७९ टक्के लागला व शाळा नेने ढालीची मानकरी ठरली. ह्याच वर्षी श्री. गाडगीळ निवृत्त झाले. त्यांच्या जागी श्री. र. वि. सोमण यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. त्याचवर्षी शाळा भरत असलेला हा सुभेदारवाडा संस्थेने विकत घेण्याचे ठरवून तसा करारही केला. १९५८ साली त्याची पूर्तता झाली आणि एक पर्व संपले. संस्था चालकांनी लगेचच पुनर्रचनेचे काम हाती घेतले. मुख्याध्यापक श्री. र. वि. सोमण यांच्या देखरेखीखाली तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार ही पुनर्रचना करण्यात आली. ह्यामुळे वास्तूचा अक्षरशः कायापालट झाला. शाळेला सुसज्ज अशी प्रयोगशाळा मिळाली व त्याला जोडूनच अध्यापनासाठीही वर्ग उपलब्ध झाला. शाळेचे मैदानही विहीरीवर जाळी बसविल्याने उत्तमरीतीने उपयोगात आणता येऊ लागले.

बदलत्या काळाबरोबर पावले टाकणारे मुख्याध्यापक श्री. र. वि. सोमण यांच्या प्रयत्नाने शाळा उत्कर्षाप्रत जाऊ लागली. अद्ययावत शिक्षण साधने आली. वाचनालयाचा लाभ योजनाबद्ध रितीने विद्यार्थ्यांना मिळू लागला. शालेय वृत्तपत्र आले. शालेय आकाशवाणीद्वारा विविध कार्यक्रम सुरू झाले. इ. ११ वी च्या

वर्गातील कच्च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास वर्ग सुरु झाले. विद्यार्थ्यांची अनुशासन सभा शालेय शिस्तीला व कार्यक्रमांना मदत करू लागली. क्रीडा क्षेत्रात शाळा चमकू लागली.

मुख्याध्यापक श्री. सोमण यांच्या योजनाबद्ध उपक्रमांमुळे त्यांच्या १५ वर्षांच्या कारकीर्दीत शाळेला ९ वेळा नेने ढाल मिळाली आणि केवळ कल्याणातच नव्हेतर ठाणे जिल्ह्यात व संस्थेत शाळेचे नाव दुमदुमू लागले. श्री. सोमण तसे हाडाचे शिक्षक, शिस्तीचे भोक्ते, धडाडीचे मुख्याध्यापक, प्रशासक व शिक्षण तज्ज्ञ. त्यांनी आपला एक चिरस्थायी ठसा शाळेवर उमटवला. त्यांच्याच कारकीर्दीत १९६५ साली शाळेने आपला अमृत महोत्सव धूमधडाक्यात साजरा केला.

अमृत महोत्सवाचे उद्घाटन त्यावेळचे गोव्याचे मुख्यमंत्री श्री. दयानंद बांदोडकर यांनी केले. कै. अक्षीकरांच्या तैलचित्राचे अनावरण विधान परिषदेचे अध्यक्ष श्री. वि. स. पागे यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध विचारवंत श्री. पा. वा. गाडगीळ यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले व त्यानंतर महाराष्ट्रातील इंग्रजी शिक्षण या विषयावर त्यांचे उद्बोधक भाषणही झाले. रात्री पं. राम मराठे यांच्या सुश्राव्य गायनाची मैफल रंगली तर अनेक नामवंत शिक्षणतज्ज्ञांनी शैक्षणिक परिसंवादात भाग घेतला.

माननीय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते व सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. भगवानराव चोळकर यांच्या हस्ते धार्मिक सोहळाही झाला आणि सहा दिवस चाललेला हा अमृत महोत्सव समारंभ यशस्वीरीतीने पार पडला.

ह्याच वर्षी शालांत परीक्षेत शाळेचा विद्यार्थी कुमार विश्वास भिडे हा कल्याण केंद्रात पहिला आला. शाळेतील शिक्षिका सौ. प्रतिभा बिवलकर ह्या बी.एड्. परीक्षेत विशेष प्रावीण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या व त्यांनी विद्यापीठात

दुसरा क्रमांक पटकाविला. कुमार सुनील स. मराठे या विद्यार्थ्यांने हिंदी माध्यम या परीक्षेत भारतात द्वितीय क्रमांक मिळविला. शैरणिक गुणवत्तेबरोबरच शाळा क्रीडा व कला क्षेत्रातही अग्रेसर राहिली. १९६८ साली शालांत परीक्षेत कुमारी निलिमा वैद्य हिला बोर्डाचे संस्कृत विषयाचे बीडकर पारितोषिक मिळाले. १९७० साली शाळेने नेने ढाल मिळवून हॅटट्रीक साधली. त्याच वर्षी श्री. च. मु. पुराणिक हे बी.एड्. परीक्षेत विद्यापीठात तिसरे आले व त्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली. या सर्वावर कळस म्हणजे शाळेचा विद्यार्थी कुमार सुधीर म. देशपांडे हा शालांत परीक्षेत बोर्डात ४ था आला व त्याने अनेक पारितोषिक मिळविली. शालेय शिस्त व शैक्षणिक गुणवत्ता ह्या बाबतीत शाळेचा लौकिक वृद्धिंगत होतच होता. शाळेतील शिक्षकांची भाषणे आकाशवाणीवरून प्रक्षेपित होऊ लागली आणि शिक्षकांची गुणवत्ताही उच्च दर्जाची आहे, हे सिद्ध होऊ लागले. १९७२ च्या जुलै महिन्यात मा. मुख्याध्यापक श्री. र. वि. सोमण निवृत्त झाले. स्वतःच्या आचरणाने इतरांना मार्गदर्शन करून, त्यांच्यातील आत्मविश्वास जागा करून, वेळ प्रसंगी निग्रहीपणे वागून व काही वेळा खंबीर निर्णय घेऊन त्यांनी शाळेच्या पूर्व परंपरा राखल्या. नवीन परंपरा जोपासल्या व शाळेच्या लौकिकात भर घातली. त्यांचा १५ वर्षाचा मुख्याध्यापक म्हणून सेवेचा कालावधी हा शाळेच्या इतिहासातील प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

१९७४ मध्ये कु. सुनिता सारंगधर ही विद्यार्थिनी शालांत परीक्षेत बोर्डात २८ वी आली आणि शाळा पुन्हा प्रगतीपथाकडे वाटचाल करू लागली. १९७५ साली नवीन अभ्यासक्रम आला. जुनी एस.एस.सी व नवी एस.एस. सी. अशा दोन बॅचेस शालांत परीक्षेसाठी पाठविल्या गेल्या. श्री लेले सर यांच्या प्रयत्नाने शाळेला उच्च माध्यमिक वर्ग सुरू करण्याची परवानगी मिळाली आणि शाळेत ११ वी (कला) व १२ वी (शास्त्र) असे दोन वर्ग सुरु झाले. शाळेतील प्रयोगशाळा विविध साहित्यांनी सुसज्ज झाली. शाळेत विज्ञान मंडळाची स्थापना झाली. या मंडळातील शिक्षकांनी

कल्याणातील अनेक मराठी शाळातील विद्यार्थी- विद्यार्थीनींना विविध प्रकारचे लहान मोठे ५५ प्रयोग करून दाखविले व सुसज्ज प्रयोग शाळेचा लाभ इतरांना होऊ लागला, श्री. इंगळे व त्यांचे सहकारी शिक्षक यांनी शाळेत शालेय वस्तू भांडार सुरु करून एक उत्तम उपक्रम सुरू केला. या सुमारास श्री. वि.कृ. लेले यांची बदली झाली. शाळेतील उच्च माध्यमिक चे वर्गही बंद झाले.

१-७-१९७७ पासून श्री. ज. य. दिक्षित मुख्याध्यापक म्हणून शाळेत आले. श्री. दिक्षित शाळेचे माजी विद्यार्थी होते. त्यांनी वार्षिक परीक्षेच्या निकालाची आखणी अतिशय योजनापूर्वक करून बरेच वर्ष इतर शाळांकडे गेलेली नेने ढाल शाळेत परत आणली. १९८० साली कुमार मकरंद हिरळीकर हा विद्यार्थी शालांत परीक्षेत बोर्डात १२ वा आला. शाळेची गुणवत्ता परत अनेकांच्या नजरेत भरू लागली. १९८९ साली तर शाळेने निकालाचा उच्चांक गाठला. शाळेचा निकाल ९१.२४ टक्के लागला. शाळेने परत एकदा नेने ढाल प्रदान समारंभ टक्केवारी मिळणाऱ्या शाळेत संपन्न होण्याचा पहिला मान शाळेने मिळविला.

ह्या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धात शाळेने अनेक ढाली व पारितोषिके मिळविली. नाट्यस्पर्धेतही विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश मिळविले. टेबल टेनिसमध्ये तालुका, जिल्हा पातळीवर नैपुण्य मिळवून शाळेतील वैद्य भगिनींनी शाळेच्या किर्तीत भर घातली. श्री. दिक्षित यांच्या प्रोत्साहनामुळे शिष्यवृत्ती परीक्षा, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षा ,राष्ट्रभाषा पुणे यांच्या हिंदीच्या परीक्षा व सरकारी पातळी चित्रकला परीक्षा यांचे वर्ग जोरात सुरू झाले त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. परीक्षांचे निकाल लागले. शाळेच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देऊन शाळेचा लौकिक वृद्धिंगत करणारे श्री. दिक्षित सर १९८२च्या ऑगस्ट अखेर निवृत्त झाले.

१९८३ साली मुख्याध्यापक म्हणून आलेले श्री मणेरीकर संस्कृतप्रेमी व संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. शाळेत बऱ्याच वर्षानंतर ८ वी पासून संपूर्ण संस्कृत हा विषय त्यांनी सुरु केला. विद्यार्थी संस्कृतच्या बहिःशालेय परीक्षेलाही बसू लागले.

त्यांच्या कारकीर्दितील महत्वाची घटना म्हणजे दुसऱ्या मजल्यावर असलेल्या माळ्याचे सुंदर सभागृहात रुपांतर. ६६ बाय ४८ असे क्षेत्रफळ असलेले हे सभागृह अतिशय उपयुक्त असे झाले. जवळ जवळ ३०० ते ३५० विद्यार्थी एकावेळी बसू शकत असल्याने अनेक कार्यक्रम सभागृहात होऊ लागले.ह्या सभागृहासाठी शाळेचे माजी विद्यार्थी श्री. कृष्णाजी यशवंत तथा दादासाहेब घारपुरे यांनी २०,००० रु. ची देणगी दिली आणि सभागृहाचे घारपुरे सभागृह असे नामकरण करण्यात आले.

ह्याच कालावधीतील महत्त्वाची घटना म्हणजे शाळेत सुरू झालेला पूर्व प्राथमिक विभाग. शालेय समिती सभासद व माध्यमिक विभागातील शिक्षक-शिक्षकेतरांची एक सभा १५-६-१९८४ रोजी मा. मुख्याध्यापक श्री. मणेरीकर यांनी आयोजित केली. शताब्दी महोत्सवाचा एक प्रकल्प म्हणून शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने पूर्व प्राथमिक व क्रमानुसार प्राथमिक विभाग सुरू करण्याचे ठरले. मुख्याध्यापक श्री. मणेरीकर यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक शिक्षकेतरांची १४ जणांची एक समिती नियुक्त करण्यात आली. समितीच्या निमंत्रक सौ. प्रतिभा बिवलकर मॅडम व श्री. च. मु. पुराणिकसर या दोघांनी इतर शिक्षकांच्या सहाय्याने ही जबाबदारी सांभाळली. ह्या समितीतील शिक्षकांनी आपली शाळेची जबाबदारी पूर्णतया सांभाळून कोणत्याही प्रकारच्या मानधनाची अपेक्षा न बाळगता शाळेव्यतिरिक्त वेळ देऊन हे सर्व काम पाहिले. त्याबद्दल ते सर्व कौतुकास पात्र आहेत.

४ ऑक्टोबर १९८४ ह्या विजयादशमीच्या सुमुहुर्तावर शाळेच्या पूर्वप्राथमिक विभागाचे उद्घाटन शाळेतील सेवानिवृत्त वयोवृद्ध माजी मुख्याध्यापक श्री. भगवानराव उर्फ भाऊसाहेब चोळकर यांच्या हस्ते झाले. जवळजवळ ९४ वर्षाच्या ह्या वयोवृद्ध गुरूने शालेय जीवनात प्रथमच प्रवेश करणाऱ्या बालकांना मनःपूर्वक शुभाशीर्वाद दिले. लहान बाळगोपाळांनी शाळा गजबजून गेली.

१९८९-९० या शताब्दी वर्षात प्राथमिक विभागातील ४थी तील विद्यार्थी माध्यमिक विभागात ५वीत येतील अशी योजना आखली. १९८५ साली इ. १ली ची तुकडी निघाली. गेल्या पाच वर्षात ह्या शाळेची विद्यार्थी संख्या अकराशेच्या घरात गेली होती. शताब्दी प्रकल्पानिमित्त सुरु केलेल्या ह्या पूर्व प्राथमिक विभागाला संस्थेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक १९-१-१९८५ रोजी मान्यता दिली.

१९८५ च्या मे अखेरीस श्री. मणेरीकर यांची बदली झाली आणि त्यांच्या जागी श्री. उ. स. माऊसकर आले. श्री. माऊसकर शाळेचे माजी विद्यार्थी व शिक्षकही. मुख्याध्यापक म्हणून पूर्व प्राथमिक विभागाकडे त्यांनी जातीने लक्ष दिले. १९८५ च्या जून मध्ये इमारत विस्ताराचा विचार सुरू झाला. दि. २२-१०-१९८५ रोजी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर नवीन इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. क. र. प्रभुदेसाई यांच्या हस्ते करण्यात आला. इमारत बांधकामाच्या कामात अनेक अडचणी आल्या. पण श्री. माऊसकर यांनी अत्यंत धडाडीने सर्व अडचणीवर मात केली आणि म्हणूनच शाळेच्या मैदानाजवळ तीन सुंदर इमारती उभ्या राहिल्या. माध्यमिक शाळेचे सर्व वर्ग नवीन इमारतीत भरू लागले आणि जुना वाडा पूर्व प्राथमिक, प्राथमिक विभागाकडे देण्यात आला. शताब्दी वर्षात शाळा पूर्णपणे पूर्व प्राथमिक प्राथमिक व माध्यमिक अशा तीन स्तरावर डौलाने उभी राहिली.

१९८७ च्या मे अखेरीस श्री. माऊसकर यांची बदली झाली. श्री. वाय. के. धस हे राष्ट्रीय पातळीवरचे खेळाडू तरुण आणि तडफदार ते मुख्याध्यापक म्हणून शाळेत आले. त्याच्या कारकीर्दीत शाळेच्या मैदानाचे रुपच पालटले. विद्यार्थी व शिक्षकही खुल्या मैदानावर अनेक खेळ खेळू लागले. शाळा सुटल्यानंतर सरावासाठी मैदानावर थांबू लागले. अनेक आंतरशालेय क्रीडास्पर्धात शाळेला स्पृहणीय यश मिळाले.

शाळेच्या इतिहासातील एक अतीव आनंदाचा क्षण म्हणजे याच वर्षी आजारपणामुळे मार्च ८७च्या शालांत परीक्षेस बसू न शकलेली आमची विद्यार्थिनी कुमारी कविता अ. सदलगेकर ही ऑक्टोबर ८७च्या शालांत परीक्षेत सर्व महाराष्ट्रात पहिली आली. अशा प्रकारे वाटचाल करत करत शाळेने २ जानेवारी १९८९ रोजी १०० व्या वर्षात पदार्पण केले. ऑक्टोबर १९८९ मध्ये मुख्याध्यापक श्री.. धस सर यांची बदली झाली व मुख्याध्यापक पदी श्री. व्ही. एन. गायकवाड यांची नियुक्ती केली.

शाळेतील सेवानिवृत्त व जेष्ठ शिक्षक श्री. रामभाऊ अभ्यंकर यांच्या हस्ते शंभरावा दीप प्रज्वलित करून शताब्दी वर्षाचा शुभारंभ झाला. केवळ आमच्या शाळेची शताब्दी म्हणून ह्या घटनेचे महत्त्व सीमित होत नसून कल्याणच्या शैक्षणिक व सांस्कृतिक जीवनाच्या शताब्दीचा हा शुभारंभ आहे. शाळेच्या नामफलकाचे अनावरण वयोवृद्ध माजी मुख्याध्यापक श्री. ग. र. केळकर यांच्या हस्ते झाले. माजी शिक्षक व कल्याण नागरिकचे संपादक श्री. वा. ना. देवधर यांनी शताब्दी विशेषांक प्रकाशित केला आणि शताब्दी महोत्सवाकडे शाळेची वाटचाल चालू झाली.

यासाठी संस्था, शालेय समिती, पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर आणि माजी विद्यार्थी व माजी शिक्षक या सर्वांच्या प्रतिनिधींची शताब्दी महोत्सव समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे

अध्यक्ष डॉ. सुरेश एकलहरे व उपाध्यक्ष डॉ. ललित काटकर हे होते. समितीच्या सभा होऊ लागल्या आणि महोत्सवाची कार्यक्रमाची योजना आकार घेऊ लागली. २९ डिसेंबर १९८९ ते २ जानेवारी १९९० असा पाच दिवसांचा भरगच्च कार्यक्रम निश्चित करण्यात आला. योजनाबध्द कार्यक्रमाने परिपूर्ण असलेला दिमाखदार शताब्दी सोहळा धूम-धडाक्यात पार पडला. रौप्य महोत्सव, सुवर्ण महोत्सव, अमृत महोत्सव असे टप्पे पार करत शाळेने शताब्दीचा उंबरठाही ओलांडला आणि शाळेची शतकोत्तर वाटचाल सुरू झाली.

या शताब्दी वर्षात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, उपक्रमांचे आयोजन केले गेले.

दि. २९ डिसेंबर १९८९ ते २ जानेवारी १९९० असा ५ दिवसात या शताब्दी महोत्सवाचा सांगता समारंभ पार पडला.तो पुढील प्रमाणे

शताब्दी महोत्सवाच्या उद्घाटनाच्या दिवशी दुपारी ४ वाजता दुर्गाडी किल्ल्यावरून देवीचा आशीर्वाद घेऊन शताब्दी ज्योत समारंभपूर्वक व मिरवणुकीने शाळेत आणण्यात आली. ज्योतीचे स्वागत उद्घाटक आमदार श्री. सुधीर जोशी (माजी महापौर, मुंबई महानगरपालिका) यांनी केले.

संध्याकाळी ५.०० वाजता शताब्दी ज्योतीने दीपमाळेतील १०१ वा दीप प्रज्वलित करून शताब्दी सोहळ्याचे उद्घाटन झाले.

अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वाघ (उपसंपादक, लोकसत्ता) यांनी विद्यार्थ्यांच्या हस्तलिखिताचे प्रकाशन केले. त्यांचे भाषण अत्यंत उद्बोधक झाले. रात्री ९.०० वाजता श्री. व. पु. काळे यांचा कथाकथनाचा रंगतदार कार्यक्रम झाला.

शनिवार दिनांक ३० डिसेंबर १९८९ रोजी आजी- माजी विद्यार्थ्यांनी कला रजनी हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाने प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. रंगभूमी व दूरदर्शन कलावंत श्री. राजन ताम्हाणे व श्रीमती रीमा लागू यांनी कला रजनीला भेट देऊन कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

रविवार दि. ३१ डिसेंबर १९८९ माजी  विद्यार्थी स्नेहसंमेलन झाले. सोमवार दि. १ जानेवारी १९९० रोजी रात्री कवी संमेलनाचा बहारदार कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात कविवर्य श्री. वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, नारायण सुर्वे, विंदा करंदीकर, शंकर वैद्य इत्यादी कवी होते.

दिनांक २ जानेवारी १९९० रोजी शाळेने आपली १०० वर्षे पूर्ण केले. या वर्धापन दिनानिमित्त सकाळी  ८ वाजता धार्मिक विधी करण्यात आले. संध्याकाळी ५.०० वाजता वर्धापन दिन सोहळा खासदार प्रा. रामभाऊ कापसे यांच्या शुभ हस्ते झाला.

या वर्षी शाळेचा शालान्त परीक्षेचा निकाल ७५.४७ टक्के लागला. विशेष उल्लेखनीय म्हणजे या वर्षी शाळेचे तीन विद्यार्थी विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले. त्यांनी शाळा व संस्थेस गौरव प्राप्त करून दिला.

गुणवत्ता यादीतील विद्यार्थी

१.कु. वैशंपायन वंदना शांताराम बोर्डात ७ वा क्रमांक

२. कु. कापडी अनघा लक्ष्मण बोर्डात ८ वा क्रमांक

३. कु. बल्लाळ अविनाश शामराव बोर्डात १५ वा क्रमांक

या गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा समाजकल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य मा. नामदार श्री. रामदास जी आठवले, यांच्या हस्ते करण्यात आले. या शताब्दी

महोत्सवाच्या आठवणी लोकांच्या मनात दीर्घकाळ रूंजी घालीत होत्या.या वर्षाची आठवण म्हणून संस्थेचे कार्याध्यक्ष मा.श्री.क.र. प्रभुदेसाई यांचे हस्ते या शाळेतील शिक्षक शिक्षकेतरांना स्मृतिचिन्ह देण्यात आली.

१९९० या शालेय वर्षात न्यू हायस्कूल कल्याण एन.सी.सी. पथक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार शाळेने एन.सी.सी. पथक सुरू केले. विशेष म्हणजे ५ सप्टेंबर १९९० या दिवशी शिक्षक दिनी मा. मुख्याध्यापक श्री. वि. ना. गायकवाड यांचा कल्याण पंचायत समिती शिक्षण खात्यातर्फे आदर्श शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला. तसेच शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. प्रतिभा बिवलकर यांनाही रोटरी क्लब ऑफ कल्याण तर्फे आदर्श शिक्षिका म्हणून पुरस्कार मिळाला.

शताब्दी वर्षाचा संकल्प म्हणून १९९० मध्ये कनिष्ठ महाविद्यालयाचे कला विभाग व तंत्र शाखा या दोन्ही विभाग सुरु झाले. यात तंत्रशाखेचे उद्घाटन कल्याण नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष मा. श्री. भगवानराव जोशी यांनी केले हे दोन्ही विभाग चांगल्या प्रतिसादात सुरू झाले.

१९९१ या वर्षी शालांत परीक्षेचा निकाल ७३.१० लागला व कु. दीक्षित अतुल कृष्णा ८७.४२ टक्के शाळेत सर्वप्रथम आला. याच वर्षी सहाय्यक शिक्षक श्री. सी. एम. पुराणिक यांचा ५ सप्टेंबर १९९१ या शिक्षक दिनी पंचायत समिती तर्फ आदर्श शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला.

उच्च माध्यमिक कलाशाखा व तंत्र शाखा यांना याचवर्षी मंडळाकडून मंजूरी मिळाली.. पर्यवेक्षक श्री. व्ही. डी. गावडे यांचा २ ऑक्टोबर १९९२ रोजी पंचायत समितीतर्फे आदर्श-शिक्षक म्हणून गौरव करण्यात आला.

याचवर्षी विद्यार्थी संख्या १५०० च्या वर गेल्यामुळे शाळेला चौथ्या लिपिकाची मंजूरी मिळाली. अर्धवेळ ग्रंथपालास पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून मंजूरी मिळाली. १९९३-९४ या शैक्षणिक वर्षांत महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ मंडळातर्फे शाळेतील कलाशिक्षक श्री. बी. एस. कोल्हे यांना उपक्रमशील कला अध्यापक व शाळेस उपक्रमशील शाळा अशी स्वतंत्र सन्मानचिन्हे मिळाली.

४ नोव्हेंबर १९९४ रोजी शाळेत पालक- शिक्षक संघ स्थापन करण्यात आला. मार्च १९९५ ची द्वितीय क्रमांकाचीअग्रवाल ढाल शाळेस मिळाली. यावर्षी लायन्स क्लब कल्याण यांच्यातर्फे श्री.पी. डी. पुराणिक यांना आदर्श शिक्षक म्हणूनगौरविण्यात आले. १९९६ पासून शाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु झाले. शाळेने कला-क्रीडा-सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत २०वे शतक ओलांडले.

जवळपास ११० वर्ष आपल्या अंगाखांद्यावर बालगोपाळांना खेळवणाऱ्या या व ज्ञानदान करणाऱ्या या शालेय वास्तूला काळानुरूप आपले बाह्य रंगरूप बदलण्याची गरज भासू लागली.

म्हणूनच ४ सप्टेंबर २००२ रोजी शाळेच्या नवीन इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या बांधकामाचा भूमिपूजन समारंभ पार पडला. माजी मुख्याध्यापक श्री. र. वि. सोमण यांच्या शुभहस्ते हे भूमिपूजन झाले. सदर समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून खासदार श्री. प्रकाश परांजपे उपस्थित होते.या काळात शाळेच्या मुख्याध्यापक पदाची धुरा श्री. डी. सी. कांबळे यांच्याकडे होती.

शैक्षणिक वर्ष २००३-०४ मध्ये संस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार (पदवीधर गट) शाळेचे उपमुख्याध्यापक श्री. आर. टी. जोशी यांना प्राप्त झाला.

क्रीडा व नाट्य क्षेत्रात जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर शाळेचे विद्यार्थी सहभाग घेऊन उज्ज्वल यश प्राप्त करत होते. मार्च २००६ चा शालांत परीक्षेचा निकाल शाळेसाठी यशाचे उत्तुंग शिखर गाठणारा होता.

शाळेची विद्यार्थिनी कु. जुईली शंकर जोशी ही मुंबई विभागात गुणवत्ता यादीत प्रथम आली. त्याचबरोबर तीन विद्यार्थी कु. चेतन दिगंबर फेगडे (६ या क्रमांक) कु. पूजा राजेंद्र कुलकर्णी (१४ वा क्रमांक) कुमार अभिजीत मुरलीधर कुंवर (१७वा क्रमांक) गुणवत्ता यादीत चमकले. संस्थेची नेने ढाल ही शाळेस प्राप्त झाली.या गुणी विद्यार्थ्यांचा गौरव कविवर्य नारायण सुर्वे यांच्या हस्ते १६ जुलै २००६ रोजी करण्यात आला. अशाप्रकारे हा निकाल सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असाच होता. शाळेच्या यशस्वी विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांनाही समाजाने पुढील पुरस्कारांनी गौरविले.

रविंद्र परशुराम भागवत

तालुका विज्ञान प्रदर्शन प्रथम पुरस्कार, जिल्हा विज्ञान प्रदर्शन प्रथम पुरस्कार, राज्य विज्ञान प्रदर्शन प्रथम पुरस्कार टाकाऊ वस्तूतून खेळणी व शैक्षणीक साहित्याची निर्मिती- राज्यपातळीवर उत्तेजनार्थ राष्ट्रीय पातळीवर दि. २००६ मध्ये होणाऱ्या पश्चिम भारत विज्ञान यात्रेत सहभागी.

डी. सी. पाटील

रोटरी क्लब कल्याणतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार,

बी. एस्. कोल्हे

रघुकुल शैक्षणिक ट्रस्ट, डोंबिवली तर्फे गुरुद्रोणाचार्य म्हणून गौरव, शासकीय रेखाकला परीक्षेसाठी समालोचक म्हणून नियुक्ती

सौ. पी. ए. बोरकर इनरव्हील कल्याण तर्फे स्वातंत्र्योत्तर काळातील कर्तृत्ववान महिला या विषयावरील वेशभूषा स्पर्धेत द्वितीय क्रमांक

१ ऑगस्ट २००६ पासून सौ. अर्चना देवगिरी शाळेच्या मुख्याध्यापकपदी रुजू झाल्या.

२००८ या वर्षी शालान्त परीक्षेत कु. सानिका सुहास म्हैसकर ही मुंबई विभागात तिसऱ्या क्रमांकाने व मुलींमध्ये प्रथमक्रमांकाने उत्तीर्ण झाली. विशेष म्हणजे या वर्षी मुंबई बोर्डात आपल्याच संस्थेतील तीन विद्यार्थ्यांनी पहिल्या तीनही क्रमांकांवर आपली नावे कोरली. अनुशासन प्रिय मुख्याध्यापिका सौ. जे. डी. गायकवाड यांनी ऑगस्ट २००८ ते फेब्रुवारी २०१० या अल्प कालावधीतही

आपल्या कामकाजाचा वेगळा ठसा उमटविला.त्यांच्या निवृत्तीनंतर श्री. व्ही. एन्. गायकवाड यांचे मार्च २०१० मध्ये शाळेच्या मुख्याध्यापकपदी पुनरागमन झाले.

याच कालावधीत डिसेंबर २०१० मध्ये शालेय बांधकामाचा दुसरा टप्पा सुरू झाला.

२०११-१२ या शालेय टप्प्यात दुसऱ्या टप्याचे बांधकाम पूर्ण होऊन मैदानावरील पिंपळाखाली असलेल्या देवळाचा जीर्णोद्धार झाला.

शालेय इमारत पूर्ण झाल्यावर पूर्व प्राथमिक विभाग तळमजला, प्राथमिक विभाग १ ला मजला, माध्यमिक विभाग २रा व ३ रा मजला, उच्च माध्यमिक विभाग ४ था मजला अशी व्यवस्था केली गेली.

शाळेला व संस्थेला लाभलेले एक आगळे वेगळे मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व म्हणजे संस्थेचे माजी कोषाध्यक्ष श्री. सी एम. पुराणिकसर

यांचा अमृतमहोत्सव माजी विद्यार्थी संस्थेतील शाळेतील आजी-माजी शिक्षक यांनी एक समिती स्थापून उत्स्फूर्तपणे दि. २९ नोव्हेंबर २०११ रोजी साजरा केला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री. प्रकाशभाई मोहाडीकर होते. हा अविस्मरणीय सोहळा शाळेच्या प्रांगणात संपन्न झाला या वर्षाचा संस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार (पदवीधर गट) सौ. प्रीती अभय बोरकर यांना मिळाला.

आतापर्यंतच्या शालांत परीक्षेच्या निकालाची सर्वोच्च टक्केवारी आपल्या शाळेने गाठली. २०१२-२०१३ यावर्षी कुमार शुभम खिलचंद चौधरी ९३.३० टक्के गुण मिळवून संस्थेत सर्वप्रथम येऊन अक्षीकर स्कॉलर ठरला. शाळेने ९८.०१ एवढी टक्केवारी प्राप्त केली.

संस्था शाळा पातळीवरील क्रीडा स्पर्धेत शाळेचे शिक्षक श्री. संजीव एम्. मोगविरा यांना ४०० मी धावणे पुरुषगटातून सुवर्णपदक मिळाले. त्याचप्रमाणे शाळेतील ग्रंथपाल श्रीमती धस पी. वाय.यांना महिला गटातून बुद्धीबळ स्पर्धेत सुवर्ण पदक, ४०० धावणे - सुवर्णपदक तसेच कॅरम स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. सहा. शिक्षिका श्रीमती एन. ए. बागल यांना बुध्दीबळ स्पधेत रौप्य पदक पटकाविले.

२ जानेवारी २०१३ शाळेच्या १२३ व्या वर्धापनदिनी वास्तुपूर्ती योगदान सत्कार समारंभ झाला. शालेय वास्तू उभी करण्यासाठी ज्या व्यक्तींनी निःस्वार्थपणे आपले योगदान दिले त्यांचा सत्कार समारंभपूर्वक करण्यात आला.

सत्कारमूर्ती

१. श्री. दिलीप मधुकर दळवी सुप्रसिद्ध वास्तूविशारद

२. श्री. जयंत निळकंठ सुभेदार वास्तुविशारद

३. सौ. साधना जयंत वैद्य वास्तुविशारद

४. श्री. अरुण रामकृष्ण खासनिस आर. सी. सी. इंजिनीअर

५. श्री. राजेंद्र भालचंद्र फाटक व्यावसायिक - सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक

६. मा. श्री. सी. एम. पुराणिक सर माजी कोषाध्यक्ष ज.ए.इ. दादर

ह्या सत्कारानिमित्ताने ह्या सत्कार मूर्तींबद्दलची कृतज्ञता शाळेने व्यक्त केली. २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात शासकीय चित्रकला स्पर्धा परीक्षेचा निकाल प्रथमच १०० टक्के लागला.

अशा रीतीने असंख्य विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधत अनेक पिढ्या घडवणारी शाळा आपल्या भौतिक व शैक्षणिक सोयींनी सुसज्ज होऊन शतकोत्तर रौप्य महोत्सवाच्या उंबरठ्यावर पोहोचली.

शाळेचे माजी पर्यवेक्षक व संस्थेचे माजी कोषाध्यक्ष मा. सी. एम. पुराणिकसर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी विद्यार्थी, माजी शिक्षक, आजी शिक्षक या सर्व पातळ्यांवर सभा घेऊन शतकोत्तर रौप्य महोत्सव समिती स्थापन करण्यात आली. शाळेचे माजी विद्यार्थी श्री. डॉ. वसंतराव काणे यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली..

२ जानेवारी २०१४ ते २ जानेवारी २०१५ या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाच्या विविध कार्यक्रमाची योजना तयार झाली व सर्वत्र एका उत्साहाचे वातावरण तयार झाले.

दि. २ जानेवारी २०१४ रोजी मा. श्री. सी. एम.पुराणिकसर यांच्या हस्ते गणेशपूजन झाले व या महोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर समितीचे उपाध्यक्ष श्री विनायक मालसे यांनी हिरवा झेंडा दाखवून विद्यार्थ्यांच्या शोभायात्रेला सुरुवात करून दिली. या शोभायात्रेत शाळेच्या आजी विद्यार्थांची विविध पथके, चित्ररथ,

आजी-माजी शिक्षक-शिक्षकेतर माजी विद्यार्थी कल्याणातील प्रतिष्ठित नागरिक यांचा सहभाग होता. शोभा यात्रेचे खास आकर्षण म्हणजे शाळेतील एक शिक्षक श्री वेदांत कुलकर्णी हे कै. गो. ना. अक्षीकरांच्या वेशभूषेत अग्रस्थानी होते. शोभा यात्रेत विद्यार्थ्यांनी चौका चौकात विविध प्रात्यक्षिके सादर केली . समूहगीते, सुभेदार वाडा शाळेच्या विजय घोषणा यांनी अवघा परिसर दुमदुमून गेला. पारनाका, टिळक चौक शंकरराव चौक गांधी चौक या मार्गे शाळेत विसर्जित झाली त्यानंतर विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला.

सनई-चौघड्यांच्या सुरात मग उद्धाटन सोहळ्याची सुरुवात झाली. मा.श्री. जगन्नाथराव शिंदे हे प्रमुख उद्घाटक होते. तर संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. उल्हास कोल्हटकर कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.याच कार्यक्रमात सुभेदारवाडा शाळेच्या वेबसाईटचे उद्धाटन श्री. सी. एम. पुराणिकसर यांच्या हस्ते झाले.

शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या सुंदर नृत्याविष्कारातून शाळेला मानवंदना दिली.

दर महिन्याला एक याप्रमाणे पुढील वर्षभर विविध छोटे मोठे कार्यक्रम उल्लेखनीय ठरला. २, ३, ४ जानेवारी २०१५ या तारखांना अनुक्रमे

प्रामुख्याने शालान्त परीक्षेत शाळेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार स्मरणिका प्रकाशन व समारोप संगीत संध्या हा माजी विद्यार्थ्याचा कार्यक्रम हे कार्यक्रम ठरविण्यात आले. अशाप्रकारे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता करण्याचे ठरले. शाळेचा १२५ वर्षांचा प्रवास म्हणजे शाळेच्या प्रगतीचा चढता आलेख आहे. पण केवळ शालेय विषयातील प्रगती म्हणजे प्रगती नव्हे. विद्यार्थी बहुश्रुत व्हावेत, त्यांचे व्यक्तिमत्व फुलावे व जीवनातील आनंद त्यांना रसिकतेने घेता यावा यासाठी शाळा विविध उपक्रम, कार्यक्रम यांच्या माध्यमातून प्रयत्नशिल आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच शरीर-मन-

बुद्धि यांच्यावरील उत्तम संस्कार. हे संस्कार घडविण्यासाठी शारदोत्सव, लोकमान्य टिळक पुण्यतिथी, गुरुपौर्णिमा, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण, कालिदास दिन, मराठी दिन, महिला दिन इ. विविध दिन शाळेत साजरे होतात. त्या निमित्ताने वकृत्व, निबंध, पाठांतर, स्मरणशक्ती, काव्यवाचन, नाट्यस्पर्धा तसेच ३ दिवसीय क्रीडा महोत्सव यांचे आयोजन केले जाते. विद्यार्थी त्यात अहमहमिकेने भाग घेतात. विद्यार्थ्यांची बहुश्रुतता वाढविण्यासाठी शाळेत सुसज्ज ग्रंथालय आहेच, त्याच बरोबर विविध माहितीपूर्ण प्याख्यानांचेही आयोजन शाळा वेळोवेळी करते. विद्यार्थी व शिक्षक त्याचा लाभ घेतात.

मुलांना लोकशाहीतील जबाबदारीची जाणीव व्हावी म्हणून लोकशाही पद्धतीने वर्ग प्रतिनिधी, जबाबदारी पार पाडण्याचे व नागरिकत्वाचे शिक्षण या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना दिले जाते.

ह्या विद्यार्थ्यातूनच उद्याचे प्रशासक, साहित्यिक, डॉक्टर, अभिनेते, समाजसेवक, कलावंत, खेळाडू निर्माण होतात. अशा संस्कारातून तयार झालेला शाळेचा विद्यार्थिगण भारतभर व परदेशातही समाजाच्या विविध क्षेत्रात कार्यरत आहे.

महाराष्ट्र सरकारचे मुख्य सचीव म्हणून निवृत्त झालेले श्री. के. जी. परांजपे, चीफ इंजिनिअर म्हणून निवृत्त झालेले श्री.  शंकरराव नातू, श्री. माधवराव भिडे, एकेकाळी विधानसभा गाजविणारे विरोधी पक्ष नेते श्री. कृष्णराव धुळप, खासदार श्री. शांताराम घोलप, शिक्षकांचे प्रश्न कळकळीने मांडणारे श्री. प्रभाकर संत, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार श्री. भाऊ साठे, तलासरी मनोर या आदिवासी क्षेत्रात तन-मन-धन अर्पून काम करणारे श्री. माधवराव काणे, छत्रपती पुरस्कार

विजेते श्री. नानासाहेब फडके अशा अनेक थोर विद्यार्थ्यांचा शाळेला अभिमान वाटतो.

प्रसिध्द नाट्य दिग्दर्शक श्री. दिलीप कोल्हटकर, बालगंधर्वाच्या गायकीवर प्रात्यक्षिकांसह व्याख्यान देणाऱ्या सौ.दीपा कार्लेकर, छत्रपती पुरस्कार विजेते श्री. दिलीप वाणी कल्याणातील विविध सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत असलेले नामांकित डॉक्टर श्री वसंतराव काणे, प्रख्यात विशारद संसाधना वैद्य प्रख्यात उद्योजक श्री सतीश पोळ श्री सतीश पै. वेगळी वाट निवडणारे श्री नागेश लोहार यांसारख्या किती विद्यार्थ्यांनी पुढील कालखंडात ही अभिमानाची परंपरा पुढे सुरू ठेवली आहे.

नवीन पिढीतील आमचे तरुण विद्यार्थी अनेक क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी करत आहेत. प्रसिध्द साहित्यिका डॉ. सौ. नीलिमा गुंडी, पार्श्व गायन क्षेत्रात आपला ठसा उमटविणारी अनुजा वर्तक, बासरीवादनातील उगवता तारा वरद कठापूरकर, सवाई गंधर्व सारख्या नामांकित संगीतमैफिलीत हार्मोनिअम वादन सादर करणारा सुधांशु घारपुरे, आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारा जिमनॅस्टिकपटू प्रेम राजन पाटील, तायक्वांडों-पटू अरुंधती देशपांडे कबड्डी कबड्डीपटु प्रशांत चव्हाण, सकाळ वृत्तपत्राचा सहसंपादक अजित अभंग, महिला पोलीस म्हणून काम करणारी तेजश्री शिरोळे यांचा शाळेला अभिमान आहे.

दिव्यावरून दिवा उजळण्याचं हे ज्ञानसाधनेचे व्रत गेली सव्वाशे वर्ष अविरत सुरू आहे. कै. अक्षीकरांनी २ जानेवारी १८९० रोजी लावलेल्या रोपट्याचा आता प्रचंड वृक्ष झाला आहे. विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या येथे घडल्या, वाढल्या आहेत

आद्य संस्थापक कै.. गो. ना. अक्षीकरांसारख्या सत्पुरुषाची  पुण्याई अनेकांचे अथक प्रयत्न, अनेकांचे दातृत्व, शाळेच्या अडीअडचणीच्या वेळी अनेकांनी केलेले मनःपूर्वक सहाय्य आणि अनेकांचा त्याग ....... या भरभक्कम पायावर मराठी माध्यमाची ही आपली शाळा घट्ट मुळे रोवून उभी आहे.

शाळा सर्वांची कृतज्ञ आहे.